# ७० टक्के लसीकरण दहा राज्यांमध्ये

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** भारताने १०० कोटी लसीकरणाचा टप्पा गुरुवारी ओलांडला. त्यापैकी ७० टक्के लसीकरण हे दहा राज्यांत झालेले आहे. देशातील इतर राज्यांमध्ये विशेषतः ईशान्यकडील राज्यांमध्ये लसीकरणाचे प्रमाण तुलनेने कमी असल्याचे समोर आले आहे. सर्व राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणात लसीकरण करणे हे पुढील आव्हान असल्याचे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

देशभरात साधारण ७४ टक्के नागरिकांची लशीची पहिली मात्रा तर ३१ टक्के नागरिकांनी दोन्ही मात्रा घेतल्या आहेत. ७० टक्के म्हणजेच सुमारे ७० कोटी ७४ लाख लसीकरण हे दहा राज्यांमध्येच झाले आहे. यात सर्वाधिक उत्तरप्रदेशमध्ये आणि त्याखालोखाल महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, गुजरात, मध्यप्रदेश, बिहार, कर्नाटक, राजस्थान, तमिळनाडू आणि आंध्रप्रदेश या राज्यांचा समावेश आहे. त्या तुलनेत ईशान्येकडील इतर राज्यांमध्ये मात्र लसीकरणाचे प्रमाण कमी आहे. देशभरात महाराष्ट्रानंतर सर्वाधिक रुग्णसंख्या असलेल्या केरळमध्ये साडे तीन कोटी लसीकरण झाले आहे. देशभरात लसीकरणामध्ये केरळचा अकरावा क्रमांक आहे.



**सर्वाधिक लसीकरण झालेली राज्ये**

| | |
|---|---|
| उत्तर प्रदेश - १२.२६ कोटी | बिहार - ६.०४ कोटी |
| महाराष्ट्र - ९.३७ कोटी | कर्नाटक - ६.२० कोटी |
| पश्चिम बंगाल - ६.८९ कोटी | राजस्थान - ६.१० कोटी |
| गुजरात - ६.७८ कोटी | तामिळनाडू - ५.४२ कोटी |
| मध्यप्रदेश - ६ कोटी ७५ लाख | आंध्रप्रदेश - ४.८७ कोटी |

### वितरण धोरण अवैज्ञानिक

लसीकरण वितरण हे केवळ लोकसंख्येवर आधारित असणे पुरेसे नाही. देशभरातील किमान जोखमीच्या गटातील सर्व व्यक्तींच्या लसीकरणाकडे प्राधान्याने लक्ष देणे गरजेचे आहे. केंद्राचे लसीकरण धोरण हे अवैज्ञानिक असून यामध्ये वितरणासह लशींच्या उपलब्धतेबाबतही आजपर्यंत अनेक गोंधळ झाले आहेत. लसीकरणाबाबतच्या धोरण लकव्यामुळे मे महिन्यानंतर लसीकरणाचा वेग मंदावला. याचा फटका पुढील दोन महिने तरी सर्व राज्यांना बसला. अन्यथा १०० कोटी लसीकरण यापूर्वीच झाले असते, असे मत 'फोरम फॉर मेडिकल एथिक्स सोसायटी'च्या व्यवस्थापकीय संचालक सुनीता बंडेवार यांनी व्यक्त केले.

### ईशान्येकडील राज्यांकडे दुर्लक्ष

गेल्या काही महिन्यांपासून ईशान्येकडील राज्यांमध्ये करोनाचा संसर्ग वेगाने वाढत आहे. परंतु तुलनेत या राज्यांमध्ये देशभरात सर्वात कमी लसीकरण झाले आहे. आसाममध्ये दोन कोटींहून अधिक लसीकरण झाले आहे. त्रिपुरा (३५ लाख), मणिपूर (१८ लाख), मेघालय (१६ लाख), अरुणाचल प्रदेश(१२ लाख), नागालँड (११ लाख), सिक्कीम (नऊ लाख) या राज्यांमध्ये लसीकरण अत्यंत कमी प्रमाणात झालेले आहे. ईशान्य भागातील ७० टक्के रुग्णसंख्या असलेल्या मिझोराममध्ये तर केवळ सहा लाख जणांचे लसीकरण झाले आहे.

### इतर राज्यांनाही धोका

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्येही एवढ्या मोठ्या संख्येने राज्यांनी लसीकरण केले यात आरोग्य कर्मचाऱ्यांचे नक्कीच कौतुक आहे. परंतु साथरोग हा जेवढा काळ पसरेल तेवढा विषाणू परिर्वतित होण्याचा धोका अधिक असतो. त्यामुळे काही राज्यांमध्ये लसीकरण जोमाने झाले असले तरी ज्या राज्यांकडे दुर्लक्ष झाले तेथे करोना फोफावत राहिला तर विषाणू परिवर्तीत होण्याची शक्यता अधिक आहे, असे साथरोगतज्ज्ञ डॉ. सुभाष साळुंखे यांनी सांगितले.

## टँकरच्या धडकेत महिलेचा मृत्यू

लोकसत्ता प्रतिनिधी

**वसई :** वसई पश्चिमेतील अंबाडी रस्त्यावर शुक्रवारी टँकरने दुचाकीला धडक दिल्याने झालेल्या अपघातात महिलेचा मृत्यू झाला आहे.

वीणा राजकुमार म्हात्रे (५२) असे अपघातात मृत्यू झालेल्या महिलेचे नाव असून त्या मैत्री पार्क येथे राहत होत्या. शुक्रवारी संध्याकाळी साडेपाचच्या सुमारास त्या दुचाकी घेऊन बाजारात निघाल्या होत्या. वसई पश्चिमेतील अंबाडी रस्त्यावर टँकरने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. यात वीणा म्हात्रे गंभीर जखमी होऊन त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी माणिकपूर पोलिसांनी टँकर चालकाला ताब्यात घेतले असून त्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आठवडाभरातील टँकर अपघाताची ही दुसरी घटना आहे. याआधी विरारच्या भाटपाडा येथेही टँकर अपघातात एकाच कुटुंबातील तीन जणांचा बळी गेला होता. वसईतील या दोन टँकर अपघाताच्या घटनांमुळे पुन्हा एकदा टँकर चालकांचा बेदरकारपणा समोर आला आहे.

# विदर्भ, मराठवाड्यात करोना रुग्णसंख्येत लक्षणीय घट

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**मुंबई :** राज्यात दिवसभरात करोनाच्या १,६३२ नव्या रुग्णांचे निदान झाले तर ४० जणांचा मृत्यू झाला. नव्या रुग्णांपैकी निम्म्यांपेक्षा जास्त रुग्ण हे मुंबई, पुणे आणि नगर या तीन जिल्ह्यांतच आहेत. विदर्भ आणि मराठवाड्यात रुग्णसंख्येत लक्षणीय घट झाली आहे.

दिवसभरात नगर जिल्हा १६२, पुणे जिल्हा २०६, पुणे शहर १०३ तर पिंपरी-चिंचवडमध्ये ७२ रुग्णांची नोंद झाली. या तीन जिल्ह्यांचा अपवाद वगळल्यास राज्याच्या अन्य भागांत रुग्णसंख्या घटली आहे. मराठवाड्यात ८४ तर विदर्भात फक्त २० नवे रुग्ण आढळले.

राज्यात सध्या २४ हजार १३८ रुग्ण हे उपचाराधीन आहेत. यात सर्वाधिक ६९५५ हे पुणे जिल्ह्यातील आहेत. राज्यात आतापर्यंत ६५ लाख ९९ हजार जणांना करोनाची लागण झाली असून, १ लाख ३९ हजार जणांचा मृत्यू झाला.

### मुंबईत आणखी ४२१ रुग्ण, पाच जणांचा मृत्यू

मुंबईत शुक्रवारी करोनाचे ४२१ नवे रुग्ण सापडले. तर पाच जणांचा मृत्यू झाला. त्यामुळे आतापर्यंत मुंबईत करोनाबाधितांची संख्या ७ लाख ५२ हजार ८०७ पर्यंत आणि मृत रुग्णांची संख्या १६ हजार २०२ पर्यंत पोहोचली आहे. मुंबईत करोना चाचण्यांत वाढ करण्यात आली असून शुक्रवारी ३८ हजार २४२ चाचण्या करण्यात आल्या. करोनामुक्तांची टक्केवारी ९७ टक्के आहे. तर रुग्ण दुपटीचा कालावधी १,३७५ दिवसांपर्यंत पोहोचला आहे.

### ठाणे जिल्ह्यात १७० बाधित

ठाणे जिल्ह्यात शुक्रवारी १७० रुग्ण आढळून आले. तर, तीन जणांचा मृत्यू झाला. कल्याण-डोंबिवली ४८, ठाणे ४१, नवी मुंबई ३८, मीरा भाईंदर २०, बदलापूर आठ, उल्हासनगर पाच, ठाणे ग्रामीण चार, अंबरनाथ तीन आणि भिवंडीतील तिघांचा समावेश आहे. ठाणे, कल्याण-डोंबिवली नवी मुंबईतील प्रत्येकी एकाचा मृत्यू झाला आहे.

## फेरीवाला धमकी प्रकरण : कासारवडवली पोलीस ठाण्यात गुन्हा

**ठाणे :** घोडबंदर येथील हिरानंदानी इस्टेट भागात महापालिकेच्या पथकाला धमकी देणारा फेरीवाला हरिभाऊ हुले याच्याविरोधात शुक्रवारी कासारवडवली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

माजीवडा-मानपाडा प्रभाग समितीच्या साहायक आयुक्त कल्पिता पिंपळे आणि त्यांच्या अंगरक्षकावर फेरीवाल्याने चाकू हल्ला केला होता. या प्रकारानंतर महापालिकेने फेरीवाल्यांविरोधात कारवाई सुरू केली. काही दिवसांपूर्वी हिरानंदानी इस्टेट भागात महापालिका पथक कारवाईसाठी गेले होते. पथक हरिभाऊ हुले याच्याविरोधात कारवाई करत असताना हरिभाऊ हुले याने चाकूचा धाक दाखवित तुमची मानच छाटू अशी धमकी दिली. या घटनेची माहिती महापालिका अधिकाऱ्यांना मिळाल्यानंतर शुक्रवारी सकाळी महापालिकेचे लिपीक काशिनाथ राठोड यांनी कासारवडवली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीच्या आधारे, हुलेविरोधात धमकावणे, सरकारी कामात अडथळला आणल्याप्रकरणी कासारवडवली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# कोरेगाव भीमा चौकशी आयोगाकडून परमवीरसिंह, रश्मी शुक्ला यांना समन्स

## ८ नोव्हेंबरला हजर राहण्याचे आदेश

**पुणे :** कोरेगाव भीमा हिंसाचार प्रकरणी नेमण्यात आलेल्या चौकशी आयोगाकडून मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमवीरसिंह आणि ज्येष्ठ पोलीस अधिकारी रश्मी शुक्ला यांना आयोगासमोर साक्ष देण्यासाठी हजर राहण्याबाबत समन्स बजावण्यात आले आहे.

कोरेगाव भीमा येथे १ जानेवारी २०१८ रोजी हिंसाचार झाला होता, तर ३१ डिसेंबर २०१७ रोजी शनिवारवाडा येथे एल्गार परिषद घेण्यात आली होती. तेव्हा रश्मी शुक्ला पुणे पोलीस आयुक्त म्हणून कार्यरत होत्या. तसेच परमवीरसिंह यांनी अतिरिक्त पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था) म्हणून एल्गार परिषदेशी निगडित अटक आरोपींकडील काही जप्त केलेले पुरावे पत्रकार परिषदेत सादर केले होते. त्यामुळे या दोघांची साक्ष महत्त्वाची असून त्याअनुषंगाने त्यांच्याकडील माहितीचा आयोगाला उपयोग होईल. परिणामी या दोघांची साक्ष आयोगासमोर व्हावी, असा अर्ज आयोगाचे वकील ॲड. आशिष सातपुते यांनी आयोगाकडे सादर केला होता. हा अर्ज मान्य करत आयोगाने राज्याच्या गृह विभागामार्फत परमवीरसिंह आणि रश्मी शुक्ला यांना समन्स बजावले आहे. ८ नोव्हेंबर रोजी आयोगासमोर हजर राहण्याचे समन्समध्ये नमूद करण्यात आले आहे.

# 'एचएमएस क्वीन एलिझाबेथ'चे मुंबईच्या समुद्रात आगमन

अनिकेत साठे, लोकसत्ता

**मुंबई :** ब्रिटनच्या शाही नौदलातील एचएमएस क्वीन एलिझाबेथ या विमानवाहू नौकेचे मुंबईलगतच्या अरबी समुद्रात आगमन झाले आहे. भारतीय नौदलासमवेत सरावासाठी प्रथमच दाखल झालेली ही विमानवाहू नौका ब्रिटनच्या सम्राज्ञीच्या नावाप्रमाणे भारदस्त आहे.

भारत-ब्रिटनच्या तिन्ही संरक्षण दलांच्या कोकण शक्ती या संयुक्त सरावास सुरूवात झाली आहे. त्या अंतर्गत २४ ते २७ ऑक्टोबर या कालावधीत भारतीय नौदल आणि ब्रिटनच्या शाही नौदलातील युध्दनौका सराव करणार आहेत. या निमित्त क्वीन एलिझाबेथ ही नौका दाखल झाली. तिच्या प्रहारक दस्त्यात (कॅरिअर स्ट्राईक ग्रुप) हजार हत्तीचे बळ देण्याची क्षमता राखणारी लढाऊ विमाने, ब्रिटन-नेदरलँडच्या सात युध्दनौका, अमेरिकन नौदलाची विनाशिका आणि शाही नौदलातील एका पाणबुडीचा समावेश आहे.

६५ हजार टन वजनाची क्वीन एलिझाबेथ ब्रिटनची आकारमानाने सर्वात विशाल नौका. पाचव्या पिढीतील लढाऊ विमान संचलनाची रचना असणारी ही जगातील पहिलीच नौका ठरली आहे. दोन डझनहून अधिक एफ - ३५ बी बहुउद्देशीय लढाऊ विमानांनी ती सभोवतालच्या विस्तीर्ण क्षेत्रावर आपले प्रभुत्व राखते. तिला गती देण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या (प्रोपेलर) यंत्रणेतून ५० हायस्पीड रेल्वेला पुरेल इतकी ऊर्जा तयार होते. या नौकेची उंची नायगारा धबधब्यापेक्षा अधिक आहे. त्यामुळे अवाढव्य डोलारा असूनही ती दिवसाला ५०० सागरी मैल अंतर सहजपणे पार करते.

### भारतीय नौदलासमवेत लवकरच सराव



युध्दनौकेच्या प्रहारक दस्त्यात ब्रिटीश, अमेरिका आणि नेदरलँडचे ३७०० नौ सैनिक, अधिकारी, वैमानिकांचा अंतर्भाव आहे. जगातील महत्त्वाच्या सागरी मार्गातून संचाराचे स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी क्वीन एलिझाबेथ २६ हजार सागरी मैलची सफर करीत आहे. त्यात ४० हून अधिक देशांना भेटी देण्यात आल्या. हिंद-प्रशांत क्षेत्रात भारतीय नौदलाशी सहकार्य वाढविले जात आहे. २१ व्या शतकात दोन्ही देशांसमोरील आव्हाने सारखीच आहेत. सभोवतालच्या क्षेत्रात चीन आपले स्थान बळकट करण्याच्या प्रयत्नात आहे. या क्षेत्रातील सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या उद्देशाने सरावातून उभय देशांची सैन्य दले आपल्या शक्तीचे प्रदर्शन करणार आहेत.

प्रहारक दस्त्यातील एचएमएस डिफेंडर नौकेत नौदलाच्या पश्चिमी मुख्यालयात प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. त्यातून दोन्ही देशांतील लष्करी संबंध वृध्दिंगत करण्याचा संदेश देण्यात आला.

### भारतीय शक्तीचे दर्शन

या सरावात भारतीय नौदलाची आयएनएस कोलकाता, आयएनएस कोची आणि आयएनएस चेन्नई या विनाशिका, आयएनएस तलवार आणि आयएनएस तेज युध्दनौका, इंधनवाहू आयएनएस आदित्य जहाजही सहभागी होत आहे. तसेच नौदलाची सी किंग ४२ बी, कामोव्ह ३१ व चेतक हेलिकॉप्टर, मिग २९, डॉनिअर आणि भारतीय हवाई दलाची जॅग्वॉर, सुखोई, हवेत हवाई हल्ल्याची पूर्वसूचना देणारे आणि हवेत इंधन भरणारे विमानही सरावात राहणार असल्याची माहिती भारतीय नौदलाकडून देण्यात आली.

**जाहीर सूचना**

**पादचारी पूल बंद राहील**

**वांद्रे स्टेशन येथील दक्षिण दिशेला पादचाऱ्यांसाठी नव्याने उभारलेला पूल (ओव्हर ब्रिज) दि. १५.११.२०२१ रोजी कार्यान्वित झालेला आहे. त्यामुळे जुना वांद्रे (दक्षिण) हा पादचाऱ्यांसाठीचा पूल दि. २३.१०.२०२१ रोजी रात्री १२.०० वाजता बंद करण्यात येईल.** होणाऱ्या गैरसोईंबद्दल दिलगिरी व्यक्त करण्यात येत आहे.

पश्चिम रेल्वे
www.wr.indianrailways.gov.in
Azadi Ka Amrit Mahotsav
0507
आम्हाला लाइक करा : www.facebook.com/WesternRly | आम्हाला फॉलो करा : www.twitter.com/WesternRly

Reliance
Industries Limited
Growth is Life

नोंदणीकृत कार्यालय: ३रा मजला, मेकर चेंबर्स ४, २२२, नरिमन पॉइंट, मुंबई – ४०० ०२१.
दूरध्वनी: ०२२–३५५५ ५००० • फॅक्स: ०२२–२२०४ २२६८ • ई-मेल: investor.relations@ril.com
CIN: L17110MH1973PLC019786

**३० सप्टेंबर, २०२१ रोजी संपलेल्या तिमाहीचा/अर्धवर्षाचा अलेखापरीक्षित एकत्रित वित्तीय परिणामांचा संक्षिप्त गोषवारा**

(₹ कोटीत, प्रति समभाग आकडेवारी व्यतिरिक्त)

| तपशिल | संपलेले तिमाही 30 सप्टेंबर, २०२१ | संपलेले अर्ध वर्ष ३० सप्टेंबर, २०२१ | संपलेले तिमाही ३० सप्टेंबर, २०२० |
|---|---|---|---|
| विक्री व सेवा मूल्य (महसूल) | १९१,५३२ | ३५०,३९४ | १२८,३८५ |
| वजा: वसूल केलेला जीएसटी | १७,४२८ | ३१,९१८ | १२,१९० |
| **प्रचलनाद्वारे महसूल** | **१७४,१०४** | **३१८,४७६** | **११६,१९५** |
| असाधारण मुद्दे आणि करपूर्व नफा | १९,२३४ | ३६,५०४ | १०,५८९ |
| करपूर्व नफा | १९,२३४ | ३६,५०४ | १०,५८९ |
| कालावधीसाठी नफा* | १५,४७९ | २९,२८५ | १०,६०२ |
| एकूण सर्वसमावेशक मिळकत (करपश्चात)* | ३१,५५९ | ४८,४४९ | ३५,०३१ |
| भरणा केलेले इक्विटी समभाग भांडवल, इक्विटी समभाग प्रत्येकी ₹१०/– मूल्याचा | ६,४५१ | ६,४५१ | ६,४४५ |
| पुनर्मूल्यांकित राखीव निधी वगळता इतर इक्विटी** | - | - | - |
| प्रति इक्विटी समभाग मिळकत (दर्शनी मूल्य ₹१०/– प्रत्येकी) (वार्षिकीकृत नाही) | | | |
| मूळ (₹ मध्ये) असाधारण मुद्दे पश्चात | २०.८८ | ३९.८६ | १४.८४ |
| मूळ (₹ मध्ये) असाधारण मुद्दे पूर्व | २०.८८ | ३९.८६ | १४.८४ |
| सौम्य (₹ मध्ये) असाधारण मुद्दे पश्चात | २०.६० | ३९.२१ | १४.६८ |
| सौम्य (₹ मध्ये) असाधारण मुद्दे पूर्व | २०.६० | ३९.२१ | १४.६८ |

*नियंत्रण विरहित स्वारस्य शेअर समाविष्ट
**३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या वर्षाचा पुर्नमूल्यांकित राखीव निधी वगळता इतर इक्विटी ₹ ६,९३,७२७ कोटी.

टिपा:
१. २२ ऑक्टोबर, २०२१ रोजी झालेल्या त्यांच्या संबंधित बैठकांमध्ये लेखापरीक्षण समितीने वरील परिणामांचा आढावा घेतला आहे आणि संचालक मंडळाने वरील परिणाम मंजूर केले असून ते प्रसारित करण्यास मंजुरी दिली आहे. कंपनीच्या वैधानिक लेखापरीक्षकांनी वरील परिणामांचा मर्यादित आढावा घेतला आहे.
२. अलेखापरीक्षित स्वतंत्र वित्तीय परिणामांविषयी अधिक माहिती खालील प्रमाणे आहे:

(₹ कोटीत)

| तपशिल | संपलेले तिमाही ३० सप्टेंबर, २०२१ | संपलेले अर्ध वर्ष ३० सप्टेंबर, २०२१ | संपलेले तिमाही ३० सप्टेंबर, २०२० |
|---|---|---|---|
| विक्री व सेवा मूल्य (महसूल) | १,०८,७५० | २,०३,५५३ | ६४,४३१ |
| वजा: वसूल केलेला जीएसटी | ५,३३२ | ९,५६५ | ३,१८५ |
| **प्रचलनाद्वारे महसूल** | **१,०३,४१८** | **१,९३,९८८** | **६१,२४६** |
| असाधारण मुद्दे आणि करपूर्व नफा | १०,९५४ | २१,१४२ | ४,६१८ |
| करपूर्व नफा | १०,९५४ | २१,१४२ | ४,६१८ |
| कालावधीसाठी नफा | ९,२२८ | १७,८२३ | ६,४०१ |
| एकूण सर्वसमावेशक मिळकत (करपश्चात) | १०,०२० | १७,३४८ | ७,०२९ |

३. ३० सप्टेंबर, २०२१ रोजी संपलेल्या तिमाहीचा आणि अर्ध वर्षाचा तपशिलवार स्वतंत्र आणि एकत्रित अलेखापरीक्षित वित्तीय परिणाम सेबी (लिस्टिंग ऑब्लीगेशन्स ॲन्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेन्टस्) रेग्युलेशन्स, २०१५ मधील रेग्युलेशन ३३ अनुशंगाने स्टॉक एक्सचेंजकडे सादर करण्यात आला आहे व वरील परिणाम त्यांचा संक्षिप्त गोषवारा आहेत.
३० सप्टेंबर, २०२१ रोजी संपलेल्या तिमाहीचा आणि अर्ध वर्षाचा तपशिलवार स्वतंत्र आणि एकत्रित अलेखापरीक्षित वित्तीय परिणाम स्टॉक एक्सचेंजेसच्या वेबसाईटवर **(www.bseindia.com / www.nseindia.com)** आणि कंपनीच्या वेबसाईटवर **www.ril.com** येथे उपलब्ध आहे.

**रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड** करिता
सही/–
मुकेश डी. अंबानी
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक

दिनांक : २२ ऑक्टोबर, २०२१

www.ril.com

MCXCCL

**मल्टी कमॉडिटी एक्सचेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेड**

एक्स्चेंज स्क्वेअर, सुरेन रोड, चकाला अंधेरी (पूर्व), मुंबई – ४०० ०९३, भारत
सीआयएन: U74999MH2008PLC185349 | ईमेल: ig-mcxccl@mcxccl.com | वेबसाइट: www.mcxccl.com

**३० सप्टेंबर, २०२१ रोजी संपलेल्या तिमाही व सहामाहीकरीता अलेखापरिक्षित आर्थिक परिणामांचे सार**

(₹ लाखांमध्ये)

| तपशील | संपलेली तिमाही ३० सप्टेंबर, २०२१ अलेखापरीक्षित | संपलेली तिमाही ३० जून, २०२१ अलेखापरीक्षित | संपलेली तिमाही ३० सप्टेंबर, २०२० अलेखापरीक्षित | संपलेली सहामाही ३० सप्टेंबर, २०२१ अलेखापरीक्षित | संपलेली सहामाही ३० सप्टेंबर, २०२० अलेखापरीक्षित | संपलेले वर्ष ३१ मार्च, २०२१ लेखापरीक्षित |
|---|---|---|---|---|---|---|
| १. प्रचालनातून एकूण उत्पन्न | १,७१४.१२ | १,९२७.२५ | २,६१९.७१ | ३,६४१.३७ | ४,३५६.९२ | ८,६८९.८४ |
| २. कालावधीकरिता निव्वळ नफा (कर अपवादात्मक व/किंवा असाधारण बाबींपूर्वी) | ६०८.६१ | ६९१.५४ | १,४१४.२२ | १,३००.१५ | २,०४०.७२ | ३,७२७.३१ |
| ३. कालावधीकरिता करापूर्वीचा निव्वळ नफा (अपवादात्मक व/किंवा असाधारण बाबींनंतर) | ६०८.६१ | ६९१.५४ | १,४१४.२२ | १,३००.१५ | २,०४०.७२ | ३,७२७.३१ |
| ४. कालावधीकरिता करानंतरचा निव्वळ नफा (अपवादात्मक व/किंवा असाधारण बाबींनंतर) | ६०३.०० | ६९१.५४ | १,४१४.२२ | १,२९४.५४ | २,०४०.७२ | ३,७२९.९६ |
| ५. कालावधीकरिता एकूण व्यापक उत्पन्न [(कालावधीकरिता सर्वसमावेशक नफा (करानंतर) आणि इतर व्यापक उत्पन्न (करानंतर)] | ५९६.२४ | ६४५.२९ | १,४२१.५४ | १,२४१.५३ | २,०४१.६८ | ३,७३३.०९ |
| ६. समभाग भांडवल (₹१०/– प्रति शेअर) | २३,९९८.५० | २३,९९८.५० | २३,९९८.५० | २३,९९८.५० | २३,९९८.५० | २३,९९८.५० |
| ७. राखीव (पुनर्मूल्यांकन निधी वगळून मागील वर्षाच्या लेखापरिक्षित ताळेबंदात दर्शविल्यानुसार) | – | – | – | – | – | (१६,२५७.६१) |
| ८. प्रत्येक समभागाचे उत्पन्न (₹१०/– प्रत्येकी)* | | | | | | |
| मूलभूत (₹) | ०.२५ | ०.२९ | ०.५९ | ०.५४ | ०.८५ | १.५५ |
| सौमिकृत (₹) | ०.२५ | ०.२९ | ०.५९ | ०.५४ | ०.८५ | १.५५ |

* अंतरिम कालावधीसाठी प्रति समभाग उत्पन्न वार्षिकीकृत नाही.

सूचना:
१. वरील तक्ता त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांचे सार आहे. त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांचे पूर्ण स्वरूप कंपनीचे संकेतस्थळ **www.mcxccl.com** वर उपलब्ध आहे.
२. दिनांक २२ ऑक्टोबर, २०२१ रोजी झालेल्या लेखापरीक्षा समितीच्या सभेत वरील निष्कर्षांचे पुनरावलोकन केले गेले आहे आणि संचालक मंडळाच्या सभेत त्यांना मान्यता मिळाली आहे.

**मल्टी कमॉडिटी एक्सचेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेड**करिता
स्वाक्षरी/–
नरेंद्र अहलावत
व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी

स्थळ: मुंबई | दिनांक: २२ ऑक्टोबर, २०२१